<u>नि. फौ. ख. क्र.१३०/२०१८</u> निशाणी ५०

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.८ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – अब्दुल रज्ज़ाक अब्दुल रऊफ

वय – ६० वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त सहा. पोलीस उपनिरीक्षक

पत्ता – रा. सैय्यदपुरा, बाळापूर, ता. बाळापूर, जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी बाळापूर पो.स्टे. येथे सन २०१८ ते २०२३ या कालावधीमध्ये हे.कॉ. म्हणून कार्यरत होतो. बाळापूर पो.स्टे. येथे नोंद असलेला अप क्र.२७९/२०१८, भादंवि कलम १४७, १४८, १४९, २९४, ३२४, ३२५ या गुन्ह्याचा तपास माझ्याकडे वरीष्ठांच्या आदेशाने वर्ग करण्यात आला. सदर तपासकामी माझ्याकडे केस डायरी, फिर्याद जबाब, छापील फिर्याद, वैद्यकीय प्रमाणपत्र इ. कागदपत्रे प्राप्त झाली. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, सदर गुन्ह्यातील फिर्यादीस आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमा करुन फिर्यादीस डोक्याला कानाला व पायाला लाकडी दांड्याने व लोखंडी सुरीने मारहाण करुन, अश्लील शिवीगाळ करुन गंभीर जखमी केले होते.

२. मी सदर घटनेबाबत फिर्यादी दाखल असलेला सरकारी रुग्णालय, अकोला येथे जावून त्याची चौकशी केली. त्यानंतर दोन पंचांना घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता माहिती देवून बोलावून घेतले. त्यानंतर मी व माझा सहाकारी श्री. उपाली, दोन पंच याच्या समवेत खाजगी वाहनाने नया नगर घटनास्थळावर गेलो. सदर घटनास्थळ हे फिर्यादीच्या भावाने आम्हाला दाखविले. त्यानंतर दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा दिसत्या परिस्थीतीचा घटनास्थळ पंचनामा केला. आता मला नि.क्र.३८ कडील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर दोन पंचासह माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यानंतर सदर गुन्ह्यातील ४ आरोपींना मी अटक केली तसेच आरोपी विलास हिवराळे यास अटक पुर्व जामीन मा. जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला येथून देण्यात आला. आता मला आरोपींचे अटक फॉर्म दाखविण्यात आले, त्यावर माझी संबंधित

आरोपींची व पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५१ ते ५४** देण्यात येत आहे.

३. आरोपी अमोल हिवराळे व दिलीप हिवराळे हे अटकेमध्ये असताना यांना सदर गुन्ह्यामध्ये वापरलेले शस्त्राबाबत विचारपूस केली असता त्यांनी गुन्ह्यात वापरलेले हत्यार काढून देतो असे दोन पंचासमक्ष मला सांगितले. त्यानुसार आरोपी अमोल हिवराळे व दिलीप हिवराळे यांचा निवेदन पंचनामा दोन पंचासमक्ष नोंदवून घेतला. आता मला सदर निवेदन पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी, आरोपींची व दोन पंचांच्या सह्या असून त्यातील मजकूर आरोपींच्या सांगण्याप्रमाणे नोंद केलेला आहे. त्यास **नि.क्र.५५ व ५६** देण्यात येत आहे.

४. त्यानंतर आरोपी, मी, उपाली सिरसाट व दोन पंचांसमवेत खाजगी वाहनाने नवानगर बाळापूर येथे गेलो. त्यानंतर आम्ही नवानगर येथील रस्त्याच्या बाजूला उतरलो तेथून आरोपी यांच्या पाठी–पाठी आम्ही गेलो असता आरोपी अमोल याच्या घरी गेला. सदर घरामध्ये कोणीही नव्हते. आरोपीने घराच्या एका कोपऱ्यातून एक लाकडी दांडा आम्हास काढून दिला व तो लाकडी दांडा गुन्ह्यात वापरला असल्याचे सांगितले. सदर लाकडी दांडा हा दोन पंचासमक्ष जागीच जप्त केला व त्याचा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला नि.क्र.३९ कडील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर, माझी व दोन पंचांची व आरोपीची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

५. त्यानंतर आरोपी दिलीप हिवराळे याने अमोल हिवराळे याच्या बाजूच्या असलेल्या घरात घेवून गेला सदर घरामध्ये कोणीही हजर नव्हते. तेथून आरोपी दिलीपने घरामध्ये ठेवलेल्या लाकडी पलंगामधून एक प्लॅस्टीक मुठ असलेला लोखंडी पात्याचा चाकू आम्हाला काढून दिला. सदर मुद्देमाल हा आम्ही जागीच दोन पंचासमक्ष जप्त करुन जप्ती पंचनामा केला. आता मला नि.क्र.४० कडील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर, माझी व दोन पंचांची व आरोपीची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

६. मला लाकडी दांडा व चाकू दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला आर्टीकल ड कडील चाकू व आर्टीकल इ कडील लाकडी दांडा दाखविण्यात आला. सदर मुद्देमाल हा तोच आहे. त्याचप्रमाणे आरोपी दिलीप व अमोल यांनी गुन्ह्याच्यावेळी घातलेले

पॅन्ट शर्ट हे दोन पंचासमक्ष आरोपीच्या राहत्या घरातून जप्त केले. अमोल हिवराळे याच्या ताब्यातून निळसर पांढरा शर्ट व ग्रे कलरची पॅन्ट जप्त करण्यात आला होता. आता मला एक निळसर सफेद रंगाचा शर्ट व ग्रे रंगाची पॅन्ट दाखविण्यात आली ती आरोपी अमोल याच्या ताब्यातून दोन पंचासमक्ष जप्त करण्यात आली होती. शर्टला **आर्टीकल उ** देण्यात येते तसेच पॅन्टला **आर्टीकल ऊ** देण्यात येत आहे. चेक्सचा काळसर सफेट् रंगाचा शर्ट व एक काळ्या रंगाची पॅन्ट ती दिलीप हिवराळे याच्याकडून जप्त करण्यात आली होती. त्यास शर्टला **आर्टीकल ए** देण्यात येते तसेच पॅन्टला **आर्टीकल ऐ** देण्यात येत आहे. आता मला सदर दोन जप्ती पंचनामे दाखविण्यात आले, त्यावर माझी व दोन पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५७ व ५८** देण्यात येत आहे.

७. त्यानंतर दि.०९.०७.२०१८ रोजी फिर्यादी याने गुन्ह्याच्या वेळी घातलेले एक पायजामा, एक शर्ट व एक बनियान दोन पंचासमक्ष त्यांच्या घरुन जप्त केले व त्याचा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला नि.क्र.३१ कडील पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी, फिर्यादीची व दोन पंचांची सही आहे. आता मला आर्टीकल अ, ब, क कडील शर्ट, पायजामा व बनियान दाखविण्यात आले ते तेच आहेत.

८. त्यानंतर गुन्ह्यात वापरलेले लाकडी दांडा व चाकू यांची वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून क्युरी (मत) मागविण्याकरीता माझ्या सहीचे पत्र दिले. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५९** देण्यात येत आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचे मत नोंदविले होते. आता मला नि.क्र.५१ कडील डॉक्टरांचा क्युरी अहवाल दाखविण्यात आला तो तोच आहे.

९. त्यानंतर फिर्यादी व आरोपी यांचे जप्त केलेल्या कपड्यांवरील रक्ताच्या डागांचा अहवाल मिळण्याकरीता न्यायवैज्ञानीक प्रयोगशाळा, अमरावती येथे माझ्या सहीच्या पत्राने पाठविले होते. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६०** देण्यात येत आहे.

१०. सदर गुन्ह्यातील फिर्यादी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सदर तपासकामी प्राप्त केले. सदर वैद्यकीय कागदपत्रांचे अवलोकन करुन आरोपींविरुध्द भादंवि कलम ३२६

वाढविण्यात आले त्याकरीता मा. बाळापूर येथील न्यायालयास पत्राद्वारे माहिती दिली. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६१** देण्यात येत आहे. सदर गुन्ह्यातील साक्षीदार यांचे जबाब नोंद केले. सदर तपासामध्ये आरोपींविरुध्द सबळ पुरावा निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. आरोपी १ ते ५ हे न्यायालयात हजर असल्याबाबत साक्षीदार यांनी ओळखले.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एन. वानखडे यांचे मार्फत उलटतपासः**

११. बाळापूर पो.स्टे. येथे मी येण्यापुर्वी जुने शहर पो.स्टे. अकोला येथे कार्यरत होतो. माझी बदली ही तारीख व महिन्यामध्ये झाली, हे मला आठवत नाही परंतु मी सन २०१८ रोजी बाळापूर पो.स्टे. येथे आलो होतो. फिर्यादी व आरोपी यांनी परस्पराविरोधी बाळापूर पो.स्टे. येथे बरेचवेळा रिपोर्ट दिले होते, याबाबत मला माहित नाही. सदर गुन्ह्याचा तपास माझ्याकडे दि.०१.०७.२०१८ रोजी देण्यात आला होता. घटना घडल्याच्या दुसऱ्या दिवशी माझ्याकडे तपास देण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्ह्यातील आरोपी विलास याने माझ्याकडे घटनेच्या दिवशीचे सीसीटिव्ही फुटेज मिळण्याकरीता अर्ज केला होता. आरोपी विलास याने घटनेच्या दिवशीचे सीसीटिव्ही फुटेज मिळण्याकरीता पो.स्टे. येथे अर्ज केला होता, याबाबत मला माहित नाही. सदर गुन्ह्याची फिर्याद देण्यात आली त्यावेळी मी पो.स्टे.ला हजर नव्हतो.

१२. घटनेच्या दिवशी माया हिवराळे हिने सदर गुन्ह्यातील फिर्यादी याच्याविरुध्द पो.स्टे. येथे रिपोर्ट दिला होता, याबाबत मला माहित नाही. घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता पंचांना मी लेखी समन्स दिले नव्हते. पंचांना मी त्यांच्या घरुन पंचनामा करण्याकरीता हजर राहण्याची विनंती फोनद्वारे केली होती. सदर दोघांचे फोन क्रमांक आज रोजी माझ्याकडे नाहीत, परंतु मी नोकरीवर होतो त्यावेळी माझ्याकडे त्यांचे क्रमांक होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचे पंच हे माझ्या ओळखीचे होते. हे म्हणणे खरे आहे की, लाकडी दांडा हा लोखंडी कुऱ्हाड, टिकास फावडे यांच्यामध्ये वापरण्यात येणाऱ्या लाकडास दांडा म्हणतात.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | लोखंडी कुऱ्हाड टिकास फावडे यात वापरण्यात येणारा दांडा चोपडा असतो ? |
| **उत्तरः** | सदर दांडा चोपडाही असतो व खरबड देखील असतो. |

१३. दांडा सरळही असतो व वाकलेला असतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी व वेळी विलास हिवराळे व दिलीप हिवराळे हे पो.स्टे. येथे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशीची सीसीटिव्ही फुटेज दाखल करण्याबाबत आम्हाला न्यायालयातून नोटीस देण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्ह्यातील घटनेबाबत मला काहीही माहिती नाही.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | सदर घटनास्थळाच्या आजूबाजूच्या लोकांचे जबाब तुम्ही नोंद केले का ? |
| **उत्तरः** | जे साक्षीदार भेटले त्यांचे जबाब मी नोंद केलेले आहे, तसेच घटनेतील प्रत्यक्षदर्शीचे जबाब मी नोंद केलेले आहेत. |

१४. मी सदर गुन्ह्यातील साक्षीदार हे फिर्यादी यांचे नातेवाईक यांचे नोंद केलेले आहेत, याबाबत मला कल्पना नाही. मी ज्या साक्षीदारांचे जबाब नोंद केले त्यांनी ते फिर्यादी याचे नातेवाईक असल्याबाबत त्यांनी मला सांगितले नाही. तसेच मी देखील त्यांच्या नातेसंबंधाबाबत चौकशी केली नाही. मी सदर गुन्ह्याचा घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता जाण्यापुर्वी पो.स्टे. येथे स्टेशन डायरीमध्ये तशी नोंद केलेली नव्हती. मी घटनास्थळ पंचनामा पुर्ण करुन पो.स्टे.ला आल्यानंतर त्याबाबतची स्टेशन डायरीमध्ये नोंद केली होती अथवा नाही, याबाबत मला आता आठवत नाही.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | गुन्ह्याच्या संबंधी पो.स्टे. येथून बाहेर जाण्यापुर्वी व येताना स्टेशन डायरीला नोंद करणे अनिवार्य आहे, हे खरे आहे काय ? |
| **उत्तरः** | प्रत्येक वेळी तशी नोंद करणे आवश्यक नाही. |

१५. आम्ही ज्या वाहनाने घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता गेलो त्याचा क्रमांक पंचनाम्यामध्ये नमुद केलेला नाही. तसेच जप्ती पंचनाम्यामध्ये आम्ही ज्या वाहनाने गेलो त्याचा क्रमांक पंचनामयामध्ये नमुद केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व फिर्यादी यांच्या ताब्यातून मी कोणतेही कपडे जप्त केलेले नाहीत. आता मला आर्टीकल इ कडील लाकडी दांडा दाखविण्यात आला सदर लाकडी दांडा हा कोठेही सहज मिळतो याबाबत मला कल्पना नाही. चाकू व सुरा यामध्ये फरक आहे. आता मला आर्टीकल ड

कडील चाकू दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल ड कडील मुद्देमालास सुरा म्हणत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल ड व इ कडील मुद्देमाल हा मी स्वतः आमच्या मालखान्यातून सदर गुन्ह्यामध्ये जप्त दाखविलेला आहे.

१६. सदर गुन्ह्यातील फिर्यादी तहसिलमध्ये काम करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यापुर्वी फिर्यादी याच्यासोबत माझी ओळख झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर तपासामध्ये मला असे निष्पन्न झाले की, फिर्यादी हा घटनेच्या दिवशी दारु पिलेला होता व त्याचा पाय नालीत पडून मोडला होता तसेच त्याच्या कानाला व हाताला नालीचा काठ लागलेला होता. घटनास्थळावर सांडपाण्याची नाली होती अथवा नाही, हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

१७. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादी यांचे जुने वाद होते. ज्या जागेबाबत वाद होता, ती जागा आरोपीच्या ताब्यात आहे, याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्ह्यातील साक्षीदार यांचे जबाब मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे न नोंद करता मी स्वतः तयार केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा जप्ती पंचनामा हा मी पोलीस स्टेशन येथे बसून तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादी यास कोणत्याही प्रकारे लाकडी दांड्याने व चाकूने मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गुन्ह्याचा चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोप पत्र दाखल केले आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– १६.१२.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.12.16 16:35:46 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १६/१२/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १६/१२/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १६/१२/२०२५ |